SE 77 (A)

# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई यांचे कार्यालय

३०३, अे विंग, ३ रा मजला, बी.एम.सी.गोडाऊन इमारत, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, टाकूर कॉम्प्लेक्स,
९० फुट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अे) अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/उपनि/ आर.द.वि./गीत गोविंद/१०६५/२०१७.
दिनांक -२४ /७ /२०१७.

वाचावे : १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतूद.
२) संस्थेचे दि.०५.०४.२०१६ रोजीचे पत्र.
३) ॲड.अखिलेश दुबे यांचे दि.२५.०४.२०१७ रोजीचे पत्र.

ज्याअर्थी, **गीत गोविंद को.ऑप.हौसिंग सो.लि., प्लॉट नं.३१३, आफ शंकर लेन, परमानंदास मेहता मार्ग, कांदिवली (प), मुंबई-६७** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यांत आलेली आहे आणि,

ज्याअर्थी, **गीत गोविंद को.ऑप.हौसिंग सो.लि., प्लॉट नं.३१३, आफ शंकर लेन, परमानंदास मेहता मार्ग, कांदिवली (प), मुंबई-६७** (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे), व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतूदीस अनुसरुन कामकाज करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्था बृहन्मुंबईच्या आर दक्षिण विभागात कार्यरत असल्याने त्या संस्थेचे निबंधक, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई हे आहेत आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे सचिव यांचे वाचावे क्र.२ च्या पत्रान्वये या कार्यालयात असे कळविले आहे की, संस्थेच्या व्यवस्थापक समितीचे पदाधिकारी तसेच संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य यांनी राजीनामे दिले असल्यामुळे संस्थेची व्यवस्थापक समिती बरखास्त झालेली आहे. तसेच ते संस्थेचे काळजीवाहु सचिव म्हणून कामकाज करीत आहे. तसेच संस्थेमधील कोणीही सभासद निवडणूक घेण्यास व व्यवस्थापक समितीमध्ये येण्यास तयार नाही असे कळविले आहे. व संस्थेचे कामकाज बंद पडले असल्यामुळे संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्यावतीने ॲड.अखिलेश दुबे यांनी वाचावे क्र.३ च्या पत्रान्वये संस्थेच्या व्यवस्थापक समितीचे पदाधिकारी तसेच संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य यांनी राजीनामे दिले असल्यामुळे संस्थेची व्यवस्थापक समिती बरखास्त झालेली आहे. तसेच ते संस्थेचे काळजीवाहु सचिव म्हणून कामकाज करीत आहे. तसेच संस्थेमधील कोणीही सभासद निवडणूक घेण्यास व व्यवस्थापक समितीमध्ये येण्यास तयार नाही असे कळविले आहे. व संस्थेचे कामकाज बंद पडले असल्यामुळे संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या गठनमध्ये दोष निर्माण झाल्यास अथवा पोकळी निर्माण झाल्यास किंवा संस्थेचे कामकाज बंद पडले असल्यास अशा संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. आणि,

ज्याअर्थी, गीत गोविंद को.ऑप.हौसिंग सो.लि., प्लॉट नं.३१३, आफ शंकर लेन, परमानंदास मेहता मार्ग, कांदिवली (प), मुंबई-६७ या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व व्यवस्थापक समिती सदस्यांनी राजीनामे दिले असल्यामुळे संस्थेची संस्थेचे कामकाज बंद पडले आहे. त्यामुळे संस्थेला नोटीस देण्याची आवश्यकता नाही व संस्थेची व्यवस्थापक समिती बरखास्त करुन संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे क्रम प्राप्त झाले आहे अशी माझी खात्री झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

Scanned by CamScanner

SE 77 (A)

# आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी डॉ.अविनाश भागवत, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई याद्वारे गीत गोविंद को.ऑप.हौसिंग सो.लि., प्लॉट नं.३१३, आफ शंकर लेन, परमानंदास मेहता मार्ग, कांदिवली (प), मुंबई-६७ या संस्थेचे व्यवस्थापक समिती बरखास्त करुन संस्थेवर श्री राजेंद्र निकम प्रामाणित लेखापरीक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांना मेहनताना म्हणून रु.२५००/- व प्रवास खर्च मंजूर करण्यात येत आहे. सदरचा खर्च संस्थेच्या निधीतून करण्यात यावा.

सदरचा आदेश आज दि.१४.०७.२०१७ रोजी माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे.

(डॉ.अविनाश भागवत),
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

प्रत :

१) चेअरमन/सचिव/खजीनदार, गीत गोविंद को.ऑप.हौसिंग सो.लि., प्लॉट नं.३१३, आफ शंकर लेन, परमानंदास मेहता मार्ग, कांदिवली (प), मुंबई-६७.
   २/- आपणांस कळविण्यात येते की, संस्थेच्या सर्व दफ्तराचा ताबा प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करावा.

२) श्री राजेंद्र निकम प्रामाणित लेखापरीक्षक
   २/- आपणांस कळविण्यात येते की, आपण संस्थेकडून सर्व दफ्तराचा ताबा घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच ६ महिन्याचे आत संस्थेची निवडणूक घेण्यात यावी.

३) समिती सदस्य, गीत गोविंद को.ऑप.हौसिंग सो.लि., प्लॉट नं.३१३, आफ शंकर लेन, परमानंदास मेहता मार्ग, कांदिवली (प), मुंबई-६७
   २/- व्यवस्थापक समिती सदस्य यांना कळविणेत येते की सदर नोटीसीच्या अनुषंगाने सविस्तर खुलासा विहित कालावधीत या सादर करण्यांत यावा.

४) चेअरमन/व्यवस्थापक, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, शाखा कांदिवली

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४) मुंबई
२.निवड नस्ती.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

Scanned by CamScanner